# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अ.क्र. | तपशील | | सविस्तर माहिती |
|---|---|---|---|
| १ | पीक/वाणाचे नाव | | **भुईमुग : भुईमुग नं. १२३ (उपटा वाण)** |
| २ | प्रसारीत केल्याचे वर्ष | | २०१२ |
| ३ | प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ | | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ४ | जमीन | | मध्यम, पाण्याचा चांगला निचरा होणारी, मऊ, भुसभुशीत, वाळुमिश्रित, चुना व सेंद्रिय पदार्थ असलेली जमीन योग्य. सामू ६.५ ते ७.५ असावा. |
| ५ | हवामान | | १. भुईमुग पिकाच्या कायिक वाढीसाठी सरासरी तापमान २५ ते ३० अंश सेल्सियस आवश्यक असते.<br>२. पुनरुत्पादनक्षम वाढीसाठी (फुलोरा, अ-या लागणे, शेंगा धारणा आणि वाढ) तापमान २५ ते ३५ अंश सेल्सियस आवश्यक असते.<br>**हंगाम :** खरीप, रब्बी, उन्हाळी |
| ६ | पेरणी/लागवडीचा कालावधी | | **खरीप** – २१ जून ते १० जुलै |
| ७ | प्रती एकरी बियाणे | | ४० किलो प्रती एकरी |
| ८ | पीक व्यवस्थापन | | |
| | १ | लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन | **बीजप्रक्रिया** – पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ३ ग्रॅम कार्बेन्डिझम हे बुरशीनाशक चोळावे. त्यानंतर प्रती १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम रायझोबियम व २५० ग्रॅम स्फूरद विरघळणा-या जीवाणूची बीजप्रक्रिया करावी.<br>**लागवड-** उपटा वाण दोन ओळीतील अंतर ३० सेंमी ठेवावे व दोन रोपातील अंतर १० सेंमी<br>**आंतरमशागत** – पेरणी झाल्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने २ कोळपण्या व २ खुरपण्या कराव्यात. पिकाला आ-या लागल्यानंतर आंतरमशागतीची कामे करु नयेत. रासायनिक तण नियंत्रणासाठी पेंडिमिथॅलिन ३० ई. सी. २.५ ते ३.३ लीटर प्रती हेक्टरी ७५० ते १००० लीटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर परंतु उगवणीपूर्वी फवारावे (प्रती १० लीटर पाण्यात २५ ते ३३ मिली पेंडिमिथॅलिन) |
| | २ | खत व्यवस्थापन | १. शेवटच्या वखराच्या पाळी आधी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळावे.<br>२. भुईमुगाला प्रती हेक्टरी २५ कि.ग्रॅ. नत्र व ५० कि.ग्रॅ. स्फुरद या प्रमाणात रासायनिक खते द्यावीत. शक्य असल्यास नत्राची मात्रा अमोनियम सल्फेटमधून द्यावी. कारण या खतात सुमारे २० % नत्र अमोनियाच्या स्वरुपात असून यात गंधक देखील उपलब्ध होतो.<br>३. अमोनियम सल्फेट उपलब्ध नसल्यास नत्राची मात्रा युरिया या खतातून द्यावी व स्फुरदसाठी सिंगल फॉस्फेटमधून द्यावी कारण या खतात १६ टक्के स्फुरद, १९.५ टक्के कॅल्शियम व |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १२.५ टक्के गंधक असते.<br>४. ४०० ते ५०० किलो हेक्टरी जिप्सम फुलधारणेच्या सुरवातीला जमिनीत मिसळावे. |
| | **३** | **पाणी व्यवस्थापन** | १. पहिले पाणी फुलोरा अवस्था : ३० ते ४० दिवस<br>२. दुसरे पाणी आ-या भरण्याची अवस्था : ४० ते ४५ दिवस<br>३. तिसरे पाणी शेंगा भरण्याची अवस्था : ६५ ते ७० दिवस<br>रब्बी हंगामात १५ ते २० दिवसाच्या अंतराने ६ ते ८ पाण्याच्या पाळया<br>उन्हाळी हंगामात ०८ ते १० दिवसाच्या अंतराने १० ते १२ पाण्याच्या पाळया<br>पाण्याचे व्यवस्थापनाकरीता तुषार सिंचनाचा वापर करावा. |
| | **४** | **कीड व्यवस्थापन** | १. भुईमुगावरील पाने पोखरणा-या व रस शोषणा-या किडींच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काच्या फवारणीची शिफारस करण्यात येते.<br>२. भुईमुगावरील स्पोडोप्टेरा अळीच्या व्यवस्थापनासाठी, इमोमेक्टीन बेंझोएट ५ डब्ल्युएसजी ( २ ग्रॅम / १० लीटर पाणी किंवा स्पीनोसॅड ४५ एससी (३ मिली/१० लीटर पाणी या कीटकनाशकाची फवारणी करावी.<br>३. **भुईमुगातील एकात्मिक कीड व्यवस्थापन :** भुईमुगातील एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी खालील आराखड्याची शिफारस करण्यात येते.<br>● जमिनीतील किडींच्या सुप्तावस्था व कोष नष्ट करण्यासाठी उन्हाळ्यात खोल नांगरट करावी.<br>● भुईमुग पिकाच्या चारही बाजुने एरंडी व सोयाबीन पिकाची लागवड करावी<br>● तंबाखुवरील अळी, घाटे अळी व पाने गुंडाळणारी अळीसाठी १० कामगंध सापळे/ हेक्टरी लावावेत.<br>● तंबाखुवरील पाने खाण-या अळीने अंडीपुंज व प्रथम अवस्थेतील अळ्या वेचुन नष्ट कराव्यात.<br>● निंबाळी अर्क ५ टक्के पेरणीनंतर २० व ३० व्या दिवशी फवारणी करावी.<br>● किडींनी आर्थिक नुकसानची पातळी गाठल्यास शिफारस केलेल्या कीटकनाशकाची फवारणी करावी ( मोनोक्रोटोफॉस ३६ एस.एल. १५ मिली/ १० ली. पाणी)<br>४. भुईमुगावर तुडतुडे व फुलकिंड्यांचा प्रादुर्भाव दिसताच प्रभावी व्यवस्थापनासाठी थायमिथॅक्झाम २५ डब्ल्यु जी २०० ग्रॅम/हे. किंवा असिटामीप्रीड २० एस पी १०० ग्रॅम/हे. यापैकी एका कीटकनाशकाची फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| | **५** | **रोग व्यवस्थापन** | भुईमुगाच्या पानावरील उशिरा येणा-या टिक्का व तांबेरा (करपा) या रोगांच्या नियंत्रणासाठी बुरशीनाशकाच्या ३ फवारण्या कार्बेन्डॅझिम ०.०५ टक्के अधिक मॅन्कोझेब ०.२५ टक्के पेरणीनंतर ४५, ५५, ७५ दिवसांनी कराव्यात. |

| | | |
|---|---|---|
| **९** | **पिकाचा कालावधी** | ११५-११८ दिवस |
| **१०** | **उत्पादकता** | १६-१८ क्विं/हे (खरीप) |
| **११** | **वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म** | १. टिक्का व तांबेरा रोगास सहनशील<br>२. तेलाचे प्रमाण: ४८ टक्के<br>३. शेंगदाण्याचे प्रमाण :६५ टक्के<br>४. १०० दाण्याचे वजन (ग्रॅम) : ३८ |
| **१२** | **वाणासंबंधीचे छायाचित्रे** |     |